


# एक होता ससुल्या



एक होता ससुल्या
लाल लाल डोळ्याचा
मऊ मऊ अंगाचा
पांढऱ्या शुभ्र रंगाचा

आईला चिकटून बसायचा
शाळेत नाही जायचा
घरात नुसता बसायचा
आळशासारखा झोपायचा

खोडी फक्त करायचा
झाडाची पाने तोडायचा
हिरव्यागार कुरणाचा
रंग त्याच्या आवडीचा

कितीदा तरी बोलावले त्याला
कधीच नाही यायचा
मी त्याच्या जवळ जाताच
धूम्म पळून जायचा

speak marathi